**ई-निविदा**

*जा.क्र. 2018/मह/गौख/ आर-आर-१३०*

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते कि, सोलापूर जिल्ह्यातील सन 2017-18 व सन 2018-19 वर्षाकरिता वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

ई-निविदा बाबतच्या सर्व अटी व शर्ती https://solapur.nic.in व https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे. ई-निविदा स्वीकारण्याची अंतिम दिनांक 23/01/2018 रोजी 16:00 वाजेपर्यंत आहे.

दिनांक: 16/01/2018

**--स्वाक्षरी--**
**अपर जिल्हाधिकारी सोलापूर**

# सोलापूर जिल्ह्यातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करिता ई-निविदा

**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**
**क्रा.मशा/कार्या-२/गौख/आरआर-१३०**
**दिनांक:-** 16 / 01 / 2018

जिल्हाधिकारी कार्यालय **सोलापूर** यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते कि, **सोलापूर** जिल्ह्यातील सन 2017-18 व सन 2018-19 वर्षाकरिता वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्यासाठी ई-निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे. सदरील निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | 16/01/2018 | ... |
| ई-निविदा स्वीकृती | 23/01/2018 | वेळ 16:00 पर्यंत |
| ई-निविदा उघडणे | 23/01/2018 | वेळ 16:00 |

**<u>अटी व शर्ती</u>**

1. ई-निविदा अर्ज शुल्क रु.1000/- ऑनलाइन पद्धतीने भरणा करावे लागेल.
2. पर्यावरण सल्लागार(Accredited Environment Consultant) mining of minerals या विभागात Quality Council of India(QCI) किंवा National Accreditation Board for Education and Training या द्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
3. वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
4. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि-10/0615/प्र.क्र. 289/ख दि.03/01/2018, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.14 सप्टेंबर 2006 (EIA Notification), दि.15.01.2016 व दि.03.03.2016 च्या तरतुदी लागू राहतील.
5. सदर निविदा **सोलापूर** जिल्ह्यातील सन 2017-18 व सन 2018-19 वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळू गटांकरिता असेल. वाळू/रेती सुधारित धोरण 2018 प्रमाणे वाळूगटांचे अंतर 200 मी. पेक्षा कमी अंतर असल्यास सदर वाळूगट एकच असल्याचे गृहीत धरण्यात येईल.
6. एका वाळू गटाकरिता सर्वात कमी किमंत ई निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 2, 3, व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
7. निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रिम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

8. पर्यावरण अनुमती प्राप्त करून देणे, Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.15.01.2016 च्या तरतुदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पूर्ण करणे बंधनकारक राहील.
9. ज्या वाळूगटास राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय पर्यावरण समितीची मान्यता मिळाल्यावर पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.
10. वाळू लिलाव झाल्यावर संबंधित लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करून देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलावधारकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.
11. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पर्यावरण बैठकीस mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठवण्यात येऊ नये व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
12. निविदा मान्य झाल्यावर रु.100/- च्या मुद्रांकनावर करारनामा करावा लागेल.
13. अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशतः कपात करून रक्कम देण्यात येईल.
14. देय असलेल्या रक्कमेतून नियमानुसार 2% आयकर (TDS) कपात करण्यात येईल.
15. कुठलीही पूर्वसूचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी **सोलापूर** यांना राहतील.
16. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी **सोलापूर** यांना राहतील.
17. सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास **सोलापूर** न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.
18. प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकरण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी **सोलापूर** यांना राहतील.
19. मा. न्यायालय व मा. हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.
20. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे

**अ. तांत्रिक लिफाफा**

i. अट क्र. 2 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र
ii. PAN card
iii. GST नोंदणी प्रमाणपत्र
iv. दोन वर्ष कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र
v. सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र

**ब. आर्थिक लिफाफा**

i. सदर दर BOQ मध्ये सादर करून BOQ अपलोड करावा.

**----स्वाक्षरीत----**

**जिल्हाधिकारी, सोलापूर.**